# प्रेसनोट

दि.१८/०२/२०२२

## पंचायत समिती, इंदापूर, जि. पुणे येथील कनिष्ठ सहायकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | इंदापुर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३३ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - अश्विनी गणेश भोंग, वय - ३६ वर्षे<br>पद - कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, इंदापूर, जि. पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५००/- (पाचशे रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५००/- (पाचशे रूपये) |

पडताळणी दिनांक :- १७/०२/२०२२.
सापळा दिनांक :- १८/०२/२०२२.
ठिकाण:- पंचायत समिती कार्यालय, इंदापुर, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे यशवंत घरकुल योजनेचे लाभार्थी असून त्या योजनेचा २० हजार रूपयेचा चेक तक्रारदार यांना देण्यासाठी लोकसेवक अश्विनी भोंग, कनिष्ठ सहायक यांनी ५०० रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचे यशवंत घरकुल योजनेचा २० हजार रूपये चा चेक तक्रारदार यांना देण्याचा मोबदला म्हणून लोकसेवक यांनी ५०० रूपये लाचेची मागणी करून स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.